(इंग्रजी टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**मुंबई येथील उच्च न्यायालयात**

**दिवाणी अपिलीय अधिकार क्षेत्र**

**रिट याचिका क्रमांक ८८२८/२०२४**

**राखून ठेवल्याचा दिनांक : २१ नोव्हेंबर २०२४**

**घोषित केल्याचा दिनांक : १७ डिसेंबर २०२४**

मंजुरी आणि स्वाक्षरीसाठी

माननीय न्या.श्री रवींद्र व्ही.घुगे.

आणि

माननीय न्या.श्री.अश्विन डी. भोबे.

१. स्थानिक वृत्तपत्रांच्या पत्रकारांना न्यायनिर्णय पाहण्याची परवानगी दिली जाऊ शकते का? }

२. पत्रकारांकडे पाठवायचे की नाही? }

३. त्यांच्या स्वामित्वांची न्यायनिर्णयाची योग्य प्रत पाहण्याची इच्छा आहे का?

४. या प्रकरणात भारतीय राज्यघटना, १९५० चा अर्थ किंवा त्याअंतर्गत करण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाविषयी कायद्याचा मोठा प्रश्न आहे का?

५. ते दिवाणी न्यायाधीशांकडे पाठवायचे आहे का?

६. या खटल्यात कायद्याचा महत्त्वाचा प्रश्न आहे का आणि न्यायनिर्णयाची प्रत नागपूर, औरंगाबाद आणि गोवा कार्यालयाला पाठवावी का?

………………………………

**मुंबई येथील उच्च न्यायालयात**

**दिवाणी अपिलीय अधिकार क्षेत्र**

**रिट याचिका क्रमांक ८८२८/२०२४**

आहेर संजय बाजीराव

वय- ३० वर्षे, धंदा-नोकरी

राहणार-राजापे, आंबिवली रोड,

आंबिवली, जिल्हा – रायगड - ४१०२०१ … याचिकाकर्ते

विरुद्ध

१. महाराष्ट्र राज्य तर्फे

सचिव शिक्षण व क्रीडा मंत्रालय,

मुंबई-४००००१

२. शिक्षणाधिकारी(माध्यमिक) जिल्हा परिषद,

नाशिक,

३. उपसंचालक

विभागीय आयुक्त नाशिक

४. अध्यक्ष/मुख्याध्यापक

शिक्षण प्रसारक मंडळ न्यू इंग्लिश

शाळा सावरगाव नगरसूळ,

येवला, नाशिक. ..उत्तरवादी

श्री.संजीव देवरे यांच्यासोबत सुश्री.सुचिता जे.पवार यांच्यासोबत श्री.जितेंद्र के. पगारे याचिकाकर्त्याचे वकिल.

श्री. व्ही.जी.बडगुजर एजीपी, राज्य/उत्तरवादी क्रमांक १, २ आणि ३ चे वकिल.

**न्यायमंच : न्या.रवींद्र व्ही. घुगे आणि**

**न्या.अश्विन डी. भोबे.**

**राखून ठेवल्याचा दिनांक : २१ नोव्हेंबर २०२४**

**घोषित केल्याचा : १७ डिसेंबर २०२४**

**<u>न्यायनिर्णय (प्रति न्या. अश्विन डी. भोबे.) :</u>**

१. न्यादेश. न्यादेशाची त्वरीत बजावणी करण्यात आली आणि पक्षकारांच्या संमतीने अंतिम सुनावणी घेण्यात आली.

२. याचिकाकर्ते आमच्यासमोर, उत्तरवादी क्रमांक २ ने दिनांक २४.११.२०२३ रोजी दिलेल्या आदेशाला("निशाण-अ"वरील) आव्हान देतात, ज्याद्वारे उत्तरवादी  क्रमांक २ यांनी उत्तरवादी  क्रमांक ४ शाळा व्यवस्थापनाने याचिकाकर्त्याची दिनांक १५.०६.२०१५ पासून दिनांक १४.०६.२०१८ पर्यंत शिक्षण सेवक म्हणून आणि त्यानंतर सहाय्यक शिक्षक ("आक्षेपित आदेश") म्हणून नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यासाठी सादर केलेला प्रस्ताव फेटाळून लावला आहे. याचिकाकर्त्याने खालील मूलभूत दिलासा मागितला आहे-

(अ) या माननीय न्यायालयाने भारतीय राज्यघटनेच्या कलम २२६ अन्वये प्राप्त अधिकारक्षेत्राचा वापर वापरून आणि दिनांक २४.११.२० रोजी उत्तरवादी क्रमांक -२ यांनी पारित केलेला आदेश रद्दबातल करावा आणि काढून टाकावा ज्याद्वारे या चिकाकर्त्याला अनुदानित वेतनावर सहाय्यक शिक्षक म्हणून मान्यता देण्यास नकार देण्यात आला आहे. आणि / किंवा

(ब) या माननीय न्यायालयाने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२६ अन्वये प्राप्त अधिकारक्षेत्राचा वापर करून परमादेश किंवा इतर योग्य निर्देश/रिट/आदेश पारित करून उत्तरवादी क्र.२ ला दिनांक १५.०६.२०१५ पासून दिनांक १४.०६.२०१८ पर्यंत शिक्षणसेवक म्हणून आणि त्यानंतर सहाय्यक शिक्षक म्हणून मंजुरी देण्याचे निर्देश द्यावेत तसेच उत्तरवादी क्रमांक ३ यांना याचिकाकर्त्याचे शालार्थ ओळखपत्र तयार करून त्यांना दरमहा वेतन आणि ९% दराने व्याजासह थकबाकी देण्याचे निर्देश द्यावेत.

याचिकाकर्त्याचे प्रकरण :

३. याचिकाकर्त्याचा दावा आहे की त्यांची नियुक्ती १५.०६.२०१५ रोजी उत्तरवादी क्रमांक ४ शाळेत महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी(सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम,१९७७(एमईपीएस अधिनियम) आणि नियम, १९८१ (एमईपीएस नियम) च्या नियम ९ अंतर्गत सहाय्यक शिक्षक पदावर करण्यात आली होती. पाटील रोहिदास सुखर या व्यक्तीच्या रिक्त पदावर याचिकाकर्त्याची नियुक्ती करण्यात आली होती. याचिकाकर्त्याचा प्रस्ताव उत्तरवादी क्रमांक ४ ने अनेक वेळा उत्तरवादी क्रमांक २ कडे पाठविला होता, परंतु उत्तरवादी क्रमांक २ ने त्याचा विचार केला नाही. याचिकाकर्त्याचा असा युक्तिवाद आहे की ११.०४.२०२२ रोजीच उत्तरवादी क्रमांक २ ने हा प्रस्ताव

नाकारला.दिनांक २६.०५.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे उत्तरवादी क्रमांक दिनांक ४ ने ११.०४.२०२२ रोजीच्या आदेशात उत्तरवादी क्रमांक २ ने उपस्थित केलेल्या प्रश्नांचे स्पष्टीकरण दिले. उत्तरवादी क्रमांक ने २ दिनांक २४.११.२०२३ रोजीच्या आदेशान्वये (निशाण-अ), याचिकाकर्त्याच्या नियुक्तीस ("आक्षेपार्ह आदेश") खालील कारणास्तव मान्यता देण्यास नकार दिला:

"१. याचिकाकर्ते टीईटी उत्तीर्ण आहेत, परंतु टीईटी प्रमाणपत्राची पडताळणी केली गेली नाही.

२. जाहिरातीच्या वृत्तपत्राची मूळ प्रत प्रस्तावासोबत जोडलेली नाही.

३. याचिकाकर्त्याची नियुक्ती दिनांक १५/६/२०१५ रोजी झाली आहे आणि बिंदूनामावलीनुसार तेथे अनुसूचित जमाती-१९, ओबीसी-६, एसबीसी-१ ही पदे रिक्त आहेत, परंतु ज्या एनटी प्रवर्गावर याचिकाकर्त्याची नियुक्ती करण्यात आली होती, त्या प्रवर्गाचे एकही पद रिक्त नाही.

४. व्यवस्थापनाकडून असे नमूद असलेले कोणतेही प्रतिज्ञापत्र सादर केले गेले नाही की व्यवस्थापनात कोणताही वाद नाही.

५. ०६ वर्षांच्या विलंबानंतर याचिकाकर्त्याचा प्रस्ताव का सादर करण्यात आला याचे कोणतेही स्पष्ट स्पष्टीकरण व्यवस्थापनाकडून सादर करण्यात आलेले नाही.

४. या न्यायालयाने दिनांक ०१.०७.२०२४ रोजी खालील आदेश दिले.

"याचिकाकर्ते उत्तरवादी क्रमांक ४ ला नोटीस देईल आणि बजावणी बाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल करतील.

याचिकाकर्ते आदेशाची प्रत जोडतील. जर उत्तरवादी क्रमांक ४ साठी कोणीही हजर नसेल तर उत्तरवादी क्रमांक ४ या याचिकेत केलेल्या विनंत्यांना विरोध करीत नाही या आधारावर न्यायालय पुढे जाईल.

१८ जुलै २०२४ रोजी पुढील सुनावणीसाठी स्थगित.

पृष्ठांक्रमांकन क्रम दुरुस्त करण्यासाठी परवानगी दिली जाते. पुढील तारखेपूर्वी दुरुस्ती करावी."

५. २३.१०.२०२४ रोजीच्या फराड पत्रकात असे नमूद केले आहे की याचिकाकर्त्याने ०१.०८.२०२४ रोजी बजावणीबाबतचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे ज्यात उत्तरवादी क्रमांक ४ ला बजावणी झाल्याचे नमूद केले आहे. उत्तरवादी क्रमांक १ ते ३ विद्वान एजीपीच्या द्वारे हजर झाले आहेत.

उत्तरवादी  क्रमांक २ चे प्रकरण :-

६. उत्तरवादी क्रमांक २ ने ०८.०७.२०२४ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करून याचिकेला विरोध केला आहे. उत्तरवादी क्रमांक २ चा असा युक्तिवाद आहे की जरी

याचिकाकर्त्याची १५.०६.२०१५ रोजी शिक्षणसेवक म्हणून नियुक्ती झाली असली तरी नियुक्तीच्या मान्यतेचा प्रस्ताव उत्तरवादी क्रमांक २ यांच्या कार्यालयाकडे २२.०२.२०२१ रोजी सादर करण्यात आला होता म्हणजेच सहा वर्षांनंतर. उत्तरवादी क्रमांक २ चा असा युक्तिवाद आहे की २२.०२.२०२१ रोजी उत्तरवादी क्रमांक २ च्या कार्यालयात सादर केलेला प्रस्ताव आवश्यक कागदपत्रे जोडले नसल्याने सदोष होता. त्यामुळे दिनांक ११.०४.२०२२ रोजीच्या आदेशान्वये हा प्रस्ताव फेटाळण्यात आला. उत्तरवादी क्रमांक ४ ने दिनांक २६.०५.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्रस्ताव पुन्हा सादर केला. दिनांक २४.११.२०२३ रोजीच्या आक्षेपित आदेशात नोंदवलेल्या कारणांमुळे उत्तरवादी क्रमांक ४ ने सादर केलेला प्रस्ताव फेटाळण्यात आला.

सादरीकरण:

७. याचिकाकर्त्याच्या वतीने बाजू मांडणारे विद्वान वकील श्री.संजीव बी. देवरे यांनी सादर की, उत्तरवादी क्रमांक २ ने दिनांक ११.०४.२०२२ रोजीच्या आदेशाद्वारे उपस्थित केलेल्या हरकती उत्तरवादी क्रमांक ४ ने दिनांक २६.०५.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे स्पष्ट केल्या होत्या आणि त्यामुळे उत्तरवादी क्रमांक २ ने प्रस्ताव नाकारणे बेकायदेशीर होते. पुढे सादर केले की याचिकाकर्त्याने टीईटी परीक्षा उत्तीर्ण केली होती, मात्र आयुक्त, महाराष्ट्र परीक्षा परिषद यांनी टीईटी प्रमाणपत्र दिले नसल्याने पडताळणी करता आली

नाही. श्री. देवरे  यांनी रिट पिटीशन क्रमांक ११९२१/२०२३ मधील दत्तात्रय देविदास सोनवले आणि अन्य विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर  या खटल्यात या न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाचा आधार घेत आक्षेपित आदेशातील आधार क्रमांक १ टिकण्यायोग्य नाही असा युक्तिवाद केला. श्री. देवरे पुढे सादर करतात की एन.टी.(बी) प्रवर्गासाठी एकही पद रिक्त नसणे हे रास्त नाही, कारण दिनांक १९.०५.२०१५ रोजीच्या जाहिरातीनुसार उत्तरवादी क्रमांक ४ ने एसटी, एसबीसी, एसटी, ओबीसी आणि खुल्या प्रवर्गातील अर्जदारांकडून अर्ज मागवले होते.  श्री. देवरे यांनी सांगितले की, जाहिरातीनुसार मुलाखतीच्या तारखेस म्हणजेच ०१.०६.२०१५ रोजी या प्रवर्गातून कोणीही हजर झाले नाही, परिणामी एन.टी.(बी) प्रवर्गातील याचिकाकर्ता हजर झाला त्याची मुलाखत, निवड व नियुक्ती झाली. श्री.देवरे यांनी युक्तिवाद केला की याचिकेत नमूद केलेल्या कारणांसाठी प्रस्ताव पाठविण्यास उशीर झाला नाही आणि विलंब झाला असे गृहीत धरले तर याचिकाकर्त्याची नियुक्ती अमान्य होणार नाही, त्यामुळे ही याचिका मंजूर करण्यात यावी, अशी विनंती श्री देवरे यांनी केली.

८. राज्य-उत्तरवादी  क्रमांक १ ते ३ चे विद्वान एजीपी श्री. व्ही. जी. बडगुजर यांनी उत्तरवादी क्रमांक २ ने दाखल केलेल्या उत्तरातील प्रतिज्ञापत्राचा आधार घेत पान क्रमांक १८[टंकलिखित प्रत पान १८ (अ) वर] वरील दिनांक १९.०५.२०१५ च्या जाहिरातीकडे

आमचे लक्ष वेधले, जी “दैनिक पुण्यनगरी” या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली होती, सादर केले गेले की सदर नोटीस अस्पष्ट आहे आणि कोणताही तपशील नाही. सादर केले गेले की “दैनिक पुण्यनगरी” या वृत्तपत्रातील प्रकाशन एमईपीएस अधिनियम व नियमांच्या आवश्यकतेनुसार नाही, ज्यात अशा प्रस्तावित नियुक्तीसाठी व्यापक प्रसिद्धी देणे बंधनकारक आहे. श्री. बडगुजर कागदपत्रांवरून (पान क्रमांक १८ वर) सादर करतात की, हे प्रकाशन हे अनोळखी दैनिक असून त्या वर्तमानपत्राचा प्रसार माहित नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या वृत्तपत्राच्या प्रसाराबाबत साशंकता आहे. श्री.बडगुजर यांनी युक्तिवाद केला की प्रस्ताव सादर करण्याच्या तारखेचा चुकीचा अर्थ लावण्याची मागणी केली जात असल्याने ही याचिका खोटेपणावर आधारित आहे. ते सादर करतात की प्रस्ताव सादर करताना कायद्याच्या अटींचे पालन केलेले नाही. श्री. बडगुजर पुढे सादर करतात की, उत्तरवादी क्रमांक ४ ने या प्रस्तावावर विचार करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. श्री.बडगुजर यांनी या आक्षेपित आदेशाचे समर्थन करत याचिका फेटाळण्याची विनंती केली.

९. प्रस्तुत याचिकेत उपस्थित केलेली वस्तुस्थिती, परिस्थिती आणि युक्तिवाद यावरून आमच्यासमोर प्रश्न असा आहे की, उत्तरवादी क्रमांक ४ ने प्रकाशित केलेली दिनांक १९.०५.२०१५ रोजीची (पान क्र.१८ वर) जाहिरात कायद्याच्या अटींशी सुसंगत आहे

का? आक्षेपित आदेश विकृतीने ग्रस्त आहे का आणि या न्यायालयाच्या असाधारण अधिकारितेत हस्तक्षेप करण्यास पात्र आहे का?

**विश्लेषण:-**

१०. माननीय सर्वोच्च न्यायालयाने तेजप्रकाश पाठक आणि इतर विरुद्ध राजस्थान उच्च न्यायालय आणि इतर.(दिवाणी अपील क्रमांक २६३४/२०१३) या खटल्यात भरती प्रक्रियेशी संबंधित प्रकरण हाताळताना असे निरीक्षण नोंदवले आहे की, “भरतीतील आदर्श म्हणजे अन्याय दूर करणे”.

११. जाहिरातीचे अवलोकन, म्हणजेच याचिकेला पान क्रमांक १८ वर जोडलेले दस्तऐवज, त्यासोबत  पान क्रमांक १८ (अ) वरील टंकलिखित केलेली प्रत, यावरून असे दिसून येते की:

अ) ज्या वृत्तपत्रावर जाहिरात(अंदाजे दिनांक १९.०५.२०१५ रोजी) प्रसिद्ध झाली होती, त्या वृत्तपत्राचा तपशील अनुपस्थित आहे. दिसून येते की जाहिरातीच्या कात्रणामध्ये या जाहिरातीच्या तारखेचा उल्लेख नाही. वृत्तपत्र प्रकाशनाचे नाव आणि प्रकाशनाचा/जाहिरातीचा दिनांक याचिकाकर्त्याने हाताने लिहिलेल्या पृष्ठांकनातून मिळू शकते, ज्यात “दैनिक पुण्यनगरी दिनांक १९ मे २०१५” असे लिहिले आहे.

ब) जाहिरातीत एसटी, ओबीसी, एसबीसी आणि खुल्या प्रवर्गातील विविध प्रवर्गांचा उल्लेख असला तरी जाहिरात केलेले पद राखीव आहे की ते खुल्या प्रवर्गातील आहे, याचा तपशील जाहिरातीत दिलेला नाही. विशेष म्हणजे, जाहिरात केलेले पद हे एक पद असले तरी जाहिरातीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचा उल्लेख आहे.

क) सदर जाहिरातीत नमूद केलेली पात्रता एचएससी (डीएड) आहेत. उमेदवाराला/ अर्जदाराने कोणत्या इयत्तेला शिकवणे आवश्यक आहे याचा संदर्भ नाही.

ड) सदर जाहिरात असे दर्शवते की ती मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याच्या स्वरूपात आहे, उमेदवारांनी दिनांक ०१.०६.२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता मुलाखतीस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले होते.

१२. या न्यायालयाने श्रीमती पूजा योगेश सिंग आणि अन्य विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर ( रिट याचिका क्र.१६१२८/२०२४) या प्रकरणात, प्रकाश दौलत पाटील विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर, (रिट याचिका क्रमांक १२८२६/२०२३) या प्रकरणातील या न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेत आणि प्रवीण बोधू कसबे विरुद्ध महाराष्ट्र राज्य

आणि इतर (रिट याचिका क्रमांक ३१४२/२०२०) या प्रकरणात परिच्छेद क्रमांक १७ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले आहे:

> Z"महाराष्ट्र राज्यातील अनुदानित खाजगी शाळांमधील शिक्षकांची नोकरी राज्य कायदा म्हणजेच एमईपीएस अधिनियम, १९७७ आणि एमईपीएस नियम, १९८१ द्वारे नियंत्रित केली जाते. अशा शिक्षकांच्या वेतनाचा भार सरकारी तिजोरीवर पडतो. त्यानुसार, असा रोजगार सार्वजनिक रोजगाराच्या कक्षेत येतो. खाजगी अनुदानित शाळांमध्ये अशा शिक्षकांची भरती/निवड/नियुक्ती भारतीय राज्यघटनेच्या कलम १६ अन्वये दिलेल्या मूलभूत अधिकारांशी सुसंगत असणे आवश्यक आहे, असे या न्यायालयाने वेळोवेळी म्हटले आहे."

१३. सार्वजनिक रोजगाराची एक महत्त्वाची गरज म्हणजे पारदर्शकता. त्यामुळे अशा पदाच्या जाहिरातीत अशा पदासाठी पात्रता व इतर पात्रता निकष असे आवश्यक तपशील नमूद करावेत, भरती प्रक्रियेचे वेळापत्रक निश्चितपणे व स्पष्टतेने प्रसिद्ध करावे. अशा प्रकारची जाहिरात त्या भागात मोठ्या प्रमाणात वितरित होणाऱ्या स्थानिक वृत्तपत्रात देणे आवश्यक आहे. या अटी मनमानी रोखण्यासाठी आणि पुढे गुणवंत उमेदवारांचीच नेमणूक केली जाईल याची खात्री करण्यासाठी आवश्यक आहेत. अशा अनिवार्य अटींचे पालन न करणे, म्हणजेच विस्तृत प्रमाणात वितरित होणाऱ्या स्थानिक

वृत्तपत्रात जाहिरातीद्वारे व्यापक प्रसिद्धी न केल्याने वशिलेबाजीवर नेमणुका किंवा नियमांच्या व्याप्ती बाहेरील नेमणूक केल्या जातात.

१४. सध्याच्या खटल्याच्या अभिलेखावरून, आणि दिनांक १९.०५.२०१५ रोजीच्या जाहिरातीचे अवलोकन केल्यास असे दिसून येते की, उत्तरवादी क्रमांक ४ ने प्रसिद्ध केलेली ही जाहिरात दिखावा आहे याची कारणे खालील प्रमाणे:

अ) याचिकाकर्त्याने “दैनिक पुण्यनगरी” या वर्तमानपत्राचे स्वरूप किंवा प्रसार दर्शविण्यासाठी कोणतेही साहित्य किंवा आधार सामग्री अभिलेखावर ठेवलेली नाही. याचिकेला निशाण सी म्हणून जोडलेली जाहिरात पान क्रमांक १८ वर आहे. वृत्तपत्राचे नाव, किंवा त्या वृत्तपत्राच्या प्रसाराचे स्वरूप या संदर्भात याचिका अर्जात मौन आहे. याचिकाकर्त्याने याचिकेच्या परिच्छेद क्रमांक ४ मध्ये आपली नियुक्ती एमईपीएस कायद्याच्या नियम ९ अन्वये असल्याचा उल्लेख केला आहे, याचिकाकर्त्याकडून वृत्तपत्र, त्याचा प्रसार आणि पुढे संपूर्ण वृत्तपत्राची प्रत आणि / किंवा संबंधित जाहिरात असलेल्या वर्तमानपत्राच्या संपूर्ण पानाची प्रत सादर करणे अपेक्षित होते. ज्या वृत्तपत्रात ही जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली, त्या संपूर्ण वृत्तपत्राची प्रत याचिकेसह दाखल करणे आवश्यक होते. त्या संदर्भातील चूक जाणीवपूर्वक केलेली दिसते. याचिकेच्या पान क्रमांक

१८ वरील दस्तऐवजावर याचिकाकर्त्याने केलेल्या हस्तलिखित पृष्ठांकनातून वर्तमानपत्राचे नाव आणि जाहिरात प्रकाशित होण्याची तारीख मिळवली जाते.

ब) उमेदवाराच्या पात्रतेच्या निकषांच्या संदर्भात दिनांक १९.०५.२०१५ रोजीची जाहिरात अस्पष्ट आहे. जाहिरातीतील अशी अस्पष्टता लक्षात घेता प्रवर्गातील इच्छुक/पात्र उमेदवार अर्ज न करण्याची आणि/किंवा मुलाखतीत सहभागी न होण्याची शक्यता आहे.

क) जाहिरातीत विविध राखीव प्रवर्गातून तसेच खुल्या प्रवर्गातून मागविण्यात येणाऱ्या अर्जांचा संदर्भ देण्यात आला असला तरी जाहिरात केलेले पद राखीव प्रवर्गासाठी आहे की खुल्या प्रवर्गासाठी हे या जाहिरातीत नमूद केलेले नाही. जाहिरात केलेल्या सर्व पदांमध्ये अशा पदाच्या श्रेणीचा उल्लेख असणे कायद्याने बंधनकारक आहे.

ड) दिनांक १९.०५.२०१५ रोजीच्या जाहिरातीत जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याचा संदर्भ देण्यात आला होता. जर या जाहिरातीचा एखाद्या उमेदवाराने शब्दशः अर्थ घेतला, तर अशा उमेदवाराच्या मनात संभ्रम निर्माण होणे साहजिक आहे, कारण या जाहिरातीचा अर्थ असा होईल की खुल्या/साधारण प्रवर्गाच्या उमेदवाराला जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे

आवश्यक असेल. एखाद्या विशिष्ट परिस्थितीत हेच खुल्या प्रवर्गातील उमेदवाराला अर्ज करण्यापासून आणि निवड प्रक्रियेत सहभागी होण्यापासून पासून रोखू शकते. याचिकाकर्त्याने याचिकेच्या परिच्छेद क्रमांक ९ मध्ये नमूद केले आहे की मुलाखतीच्या तारखेस दिनांक १९.०५.२०१९ च्या जाहिरातीत अधिसूचित केलेल्या प्रवर्गातील उमेदवार उपस्थित नव्हते आणि म्हणूनच एनटी प्रवर्गातील याचिकाकर्त्याची निवड करण्यात आली होती.

१५. माननीय सर्वोच्च न्यायालयाने रेणू आणि इतर विरुद्ध जिल्हा आणि सत्र न्यायाधीश, तिस हजारी न्यायालय आणि अन्य (२०१४) १४ एससीसी ५० या खटल्यात परिच्छेद क्रमांक १६ व १७ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण केले आहे:-

..१६. सार्वजनिक नियुक्तीची आणखी एक महत्त्वाची आवश्यकता म्हणजे पारदर्शकता. त्यामुळे, निवड व भरतीसाठी किती पदे उपलब्ध आहेत, हे जाहिरातीत नमूद करणे आवश्यक आहे. अशा पदांसाठी अहर्ता व इतर पात्रता निकष स्पष्टपणे देण्यात यावेत व भरती प्रक्रियेचे वेळापत्रक निश्चिततेने व स्पष्टतेने प्रसिद्ध करावे. ही निवड कोणत्या नियमांतर्गत करायची आहे आणि नियमांअभावी कोणत्या प्रक्रियेअंतर्गत निवड होण्याची शक्यता आहे, हेही जाहिरातीत नमूद करण्यात यावे. हे मनमानी रोखण्यासाठी आणि निवड प्रक्रिया

सुरू झाल्यानंतर निवडीचे निकष बदलू नयेत, त्यामुळे इतरांचे नुकसान करून कोणाचा तरी अन्यायकारक फायदा होऊ नये, यासाठी आवश्यक आहे.

१७. अशा प्रकारे, वरील निर्णय हे राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ आणि १६ नुसार सार्वजनिक पदांवर नियुक्ती करताना मर्यादा निर्धारित करण्यासाठी प्रमाण आहेत. या न्यायालयाने आणि पुन्हा काय नाकारले गेले आहे ते म्हणजे "वशिलेबाजीवर नियुक्त्या किंवा नियमांचे व्याप्ती बाहेरील नियुक्ती".

१६. माननीय सर्वोच्च न्यायालय ओरिसा राज्य आणि अन्य विरुद्ध ममता मोहंती (२०११) ३ एससीसी ४३६ या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ३५ आणि ३६ मध्ये खालील प्रमाणे नमूद केले आहे :-

" ३५ . एकेकाळी या न्यायालयाचे असे मत होते की सेवायोजन कार्यालयातून नावे मागविल्यास सार्वजनिक रोजगारातील घराणेशाही आणि भ्रष्टाचाराला काही प्रमाणात आळा बसेल. परंतु, नंतर कलम १६ च्या आवश्यकतांशी सुसंगत अशी काही तरी योग्य पद्धत अवलंबली जावी, असा निष्कर्ष निघाला. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर अर्ज मागविणारी नोटीस योग्य पद्धतीने प्रसिद्ध करावी आणि त्यास प्रतिसाद म्हणून अर्ज करणाऱ्या सर्वांचा निष्पक्ष विचार व्हावा. सेवायोजन कार्यालयाकडून उमेदवारांची नावे मागवली जात असली, तरी त्याशिवाय

मोठ्याप्रमाणात वितरित होणाऱ्या वृत्तपत्रांमध्ये रिक्त पदांची जाहिरात देऊन किंवा रेडिओ व दूरचित्रवाणीवर घोषणा करून खुल्या बाजारातून सर्व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविणे नियोक्त्यास बंधनकारक केले आहे कारण केवळ सेवायोजन कार्यालयाकडून नावे मागविणे राज्यघटनेच्या उपरोक्त कलमाची आवश्यकता पूर्ण करत नाही. (दिल्ली डेव्हलपमेंट हॉर्टिकल्चर एम्प्लॉईज युनियन विरुद्ध दिल्ली प्रशासन) (१९९२) ४ एससीसी ९९, हरियाणा राज्य विरुद्ध प्यारा सिंग (१९९२) ४ एससीसी ११८, उत्पादन शुल्क विरुद्ध के. बी. एन. विश्वेश्वर राव, (१९९६) ६ एससीसी २१६, अरुण तेवरा विरुद्ध जिल्हा मानसावी शिक्षक संघ (१९९८) २ एससीसी ३३२, बिनोदकुमार गुप्ता विरुद्ध राम आश्रय माहोतो (२००५) ४ एससीसी २०९, नॅशनल फर्टीलायझर्स लि. विरुद्ध सोमवीर सिंग (२००६) ५ एससीसी ४९३, दूरसंचार जिल्हा व्यवस्थापक विरुद्ध केशब देब (२००८) ८ एससीसी ४०२, बिहार राज्य विरुद्ध उपेंद्र नारायण सिंह (२००९) ५ एससीसी ६५, आणि मध्य प्रदेश राज्य विरुद्ध मोह. अब्राहीम (२००९) १५ एससीसी २१४.)

३६. त्यामुळे, हा एक स्थापित कायदेशीर सिद्धांत आहे की सर्व पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविल्याशिवाय तात्पुरत्या किंवा तदर्थ तत्त्वावरही

कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करता येणार नाही. सेवायोजन कार्यालयाकडून केवळ नावे मागवून किंवा सूचना फलकावर सूचना लावून एखादी नियुक्ती केल्यास घटनेच्या कलम १४ व १६ ची आवश्यकता पूर्ण होणार नाही. असा क्रम भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ आणि १६ च्या जनादेशांचे उल्लंघन करतो कारण यामुळे या पदासाठी पात्र उमेदवारांना विचारात घेण्यापासून वंचित ठेवले जाते. या तरतुदींचे उल्लंघन करून नियुक्त केलेली व्यक्ती वेतन तसेच इतर कोणत्याही सवलतीस पात्र नाही. वैध आणि कायदेशीर नियुक्तीसाठी वरील घटनात्मक आवश्यकतेचे अनिवार्य पालन करणे आवश्यक आहे. कलम १६ मधील समानतेच्या कलमानुसार अशी प्रत्येक नियुक्ती खुल्या जाहिरातीद्वारे करणे आवश्यक आहे, जेणेकरून सर्व पात्र व्यक्ती गुणवत्तेच्या आधारावर स्पर्धा करू शकतील.

१७. माननीय सर्वोच्च न्यायालय बिहार राज्य विरुद्ध उपेंद्र नारायण सिंह आणि इतर (२००९) ५ एससीसी ६५ या खटल्यात "बिघडलेली व्यवस्था" या संकल्पनेशी निगडित परिच्छेद क्रमांक ३२ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले आहे:

“३२. राज्याच्या अखत्यारीतील कोणत्याही पदावर नियुक्तीसाठी रोजगाराशी संबंधित बाबींमध्ये सर्व नागरिकांना समान संधी असावी, असा कलम १६ चा

मूलभूत आदेश असूनही, १७ व्या आणि १८ व्या शतकात अमेरिकेत अस्तित्वात असलेल्या बिघडलेल्या व्यवस्थेने सार्वजनिक रोजगार यंत्रणेच्या विविध विभागांमध्ये आपले पाय पसरले आहेत आणि लाखो लोकांच्या कायदेशीर आणि घटनात्मक अधिकारांवर प्रतिकूल परिणाम करणारा मोठा बेकायदेशीर रोजगार बाजार देशात विकसित झाला आहे देशातील तरुण पिढीतील गुणवंत सदस्य, ज्यांना न्यायालयाचा हस्तक्षेप मागण्यास भाग पाडले जाते आणि वर्षानुवर्षे न्यायाची प्रतीक्षा करावी लागते."

१८. माननीय सर्वोच्च न्यायालय उत्पादन शुल्क अधीक्षक मलकापट्टणम, कृष्णा जिल्हा, ए. पी. विरुद्ध के. बी. एन. विश्वेश्वर राव आणि इतर (१९९६)६ एससीसी २१६ या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ६ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे:

"६. संबंधित युक्तिवादांचा विचार करता, आमचे असे मत आहे की उत्तरवादींचा युक्तिवाद अधिक स्वीकारार्ह आहे जो निष्पक्ष खेळ, न्याय आणि समान संधी या तत्त्वांशी सुसंगत आहे. अनेक उमेदवारांची नावे एकतर नोंदणीकृत असली किंवा सेवायोजन कार्यालयामध्ये नोंदणीच्या प्रतीक्षेत असूनही त्यांना नावे प्रायोजित करता येत नाहीत, परिणामी निवडीचा निवडपर्याय केवळ अशा उमेदवारांपुरताच मर्यादित राहतो ज्यांची नावे सेवा योजना कार्यालयाद्वारे प्रायोजित केली जातात.

अशापरिस्थितीत, अनेक पात्र उमेदवार राज्यांतर्गत एखाद्या पदावर नियुक्तीसाठी विचार करण्याच्या अधिकारापासून वंचित राहतात. चांगला दृष्टिकोन दिसून येतो की मागणी करणाऱ्या प्राधिकरणाला/आस्थापनाला सेवायोजन कार्यालयाला कळविणे बंधनकारक असावे आणि सेवायोजन कार्यालयाने मागणीनुसार सेवाज्येष्ठता व आरक्षणानुसार काटेकोर निवडीसाठी उमेदवाराची नावे मागणी करणाऱ्या विभागांकडे प्रायोजित करावीत. याव्यतिरिक्त, योग्य त्या विभागाने किंवा उपक्रमाने किंवा आस्थापनाने मोठ्या प्रमाणात वितरित होणाऱ्या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्धीद्वारे नावे मागवावीत व त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकांवर लावावीत किंवा रेडिओ, दूरचित्रवाणी व रोजगार रोजगार वार्तापत्रावर जाहीर करावे; आणि त्यानंतर अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांच्या प्रकरणांचा विचार करा. या पद्धतीचा अवलंब केल्यास न्याय्य व्यवहाराला उपकारक ठरेल. नोकरीच्या बाबतीत संधीची समानता सर्व पात्र उमेदवारांना उपलब्ध असेल."

१९. आम्हाला असे आढळते की दिनांक १९.०५.२०१५ रोजीची ही जाहिरात दिखाव्यासाठी म्हणून प्रसिद्ध करण्यात आली होती आणि वशिल्यावर नियुक्ती देण्याचा प्रयत्न होता, ज्यामुळे इतरांचे नुकसान करून एखाद्याला अन्यायकारक फायदा होत असल्याचे आमच्या निदर्शनास आले आहे. उत्तरवादी क्रमांक ४ च्या या कृतीमुळे पात्र

उमेदवाराला सार्वजनिक नोकरीत सहभागी होण्याची संधी नाकारण्यात आली आहे आणि म्हणूनच, मोठ्या प्रमाणात जाहिरात न केलेल्या रिक्त जागेवर याचिकाकर्त्याची नियुक्ती करणे घटनेच्या कलम १६ चे उल्लंघन आहे. उत्तरवादी क्रमांक ४ ने सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत स्पर्धा पद्धतशीरपणे टाळली आहे. या न्यायालयाने श्रीमती पूजा योगेश सिंग आणि अन्य विरुद्ध.महाराष्ट्र राज्य आणि इतर (सुप्रा), प्रकाश दौलत पाटील विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर (सुप्रा) आणि प्रवीण बोधू कसबे विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर (सुप्रा), अज्ञात स्थानिक दैनिके आणि / किंवा प्रसार नसलेल्या दैनिकांमध्ये जाहिराती प्रकाशित करण्याच्या व्यवस्थापनाच्या प्रथेवर नाराजी व्यक्त केली आहे. या उत्तरवादी क्रमांक ४ चे उपरोक्त कृत्य मनमानी व अन्यायकारक ठरवणे आवश्यक आहे.

२०. आणखी एक पैलू ज्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे ते म्हणजे पृष्ठ क्रमांक १९ (निशाण-डी) वरील दस्तऐवज रिक्त पदांच्या नामावली / आरक्षणाचा संदर्भ देतो. हा दस्तऐवज दिनांक १६.०१.२०१६ रोजीचा आहे, तर जाहिरात दिनांक १९.०५.२०१५ रोजीची आहे. हे आणखी एक कारण आहे जे भरती प्रक्रियेत उत्तरवादी क्रमांक ४ ने अवलंबलेल्या कार्यपद्धतीबद्दल शंका निर्माण करते.

२१. उत्तरवादी क्रमांक १, २ आणि ३ यांनी याचिकाकर्त्याच्या नियुक्तीच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यास सहा वर्षांच्या विलंबा संदर्भात जारी केलेला मुद्दा उपस्थित केला आहे. उत्तरवादींनी आपल्या प्रतिज्ञापत्रात याचिकाकर्त्याने केलेल्या खोट्या विधानांच्या संदर्भात याचिकाकर्त्याच्या वर्तनाचा मुद्दा उपस्थित केला आहे. उत्तरवादी क्रमांक २ ने प्रतिउत्तराच्या प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद ४ (अ) मध्ये नमूद केले आहे की, याचिकाकर्त्याचा मंजुरीसाठीचा प्रस्ताव दिनांक ०१.०८.२०१५ रोजीच्या जावक क्रमांक १२६/२०१५-१६ चा असला तरी तो उत्तरवादी क्रमांक २ च्या कार्यालयास २२.०२.२०२१ रोजी प्राप्त झाला होता. त्यामुळे उत्तरवादी क्रमांक २ चा युक्तिवाद आहे की याचिकाकर्त्याने प्रस्तावाचा जावक क्रमांक तारखेपूर्वीचा दाखवून गैरप्रकार केला आहे. यामुळे सार्वजनिक रोजगार निवड प्रक्रियेत अपेक्षित असलेल्या निष्पक्षता/पारदर्शकता याबाबत पुन्हा एकदा शंका निर्माण होते. सध्याच्या खटल्यातील उत्तरवादी क्रमांक ४ ने सार्वजनिक रोजगाराशी संबंधित बाबींमध्ये पद्धतशीरपणे स्पर्धा टाळली आहे. आमच्या मते, या सर्व घटकांमुळे अन्याय झाला आहे.

२२. उत्तरवादी क्रमांक ४ व्यवस्थापनाने हाती घेतलेली निवड प्रक्रिया अन्यायकारक आहे, असे मानून दिनांक १५.०६.२०१५ पासून नियुक्ती झाल्यापासून सुमारे दहा वर्षे सेवेत असलेल्या याचिकाकर्त्याला केवळ उत्तरवादी क्रमांक ४ च्या कारणास्तव सेवेतून

विस्थापित केले जावे का, ही आमच्यासमोरील समस्या आहे. वर नमूद केल्याप्रमाणे चुका उत्तरवादी क्रमांक ४ ने केल्या आहेत, ज्या चुका अनियमिततेच्या स्वरूपाच्या आहेत. उत्तरवादी क्रमांक २ चे प्रकरण असे नाही की याचिकाकर्ते सहाय्यक शिक्षक म्हणून नियुक्त होण्यास अपात्र होते. त्याचप्रमाणे याचिकाकर्त्याकडे वरील जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक अर्हता होती.

२३. अशा प्रकारे मुद्दा असा आहे की उत्तरवादी क्रमांक ४ ने केलेल्या चुका आणि अनियमिततेसाठी, या टप्प्यावर याचिकाकर्त्यास सेवेतून काढून टाकणे योग्य ठरेल का? यामुळे केवळ याचिकाकर्त्याचाच पूर्वग्रह होणार नाही, तर याचिकाकर्त्याच्या तसेच याचिकाकर्त्याच्या कुटुंबियांच्या जीवनावर त्याचा व्यापक परिणाम होईल.

२४. हे समतावादी न्यायालय आहे आणि आदेश देताना या न्यायालयाला समानतेचा समतोल राखावा लागतो. या न्यायालयाचा प्रयत्न नेहमीच उपरोक्त दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून राहिला आहे.

२५. अरीब हसन अन्सारी नजीब हसन अन्सारी विरुद्ध महाराष्ट्र राज्य, वैद्यकीय शिक्षण व औषध विभागाचे सचिव आणि अन्य रिट याचिका क्रमांक १७७१/२०२३ या प्रकरणात आणि इतर काही प्रकरणांमध्ये, या न्यायालयाचे खंडपीठ, ज्यात आमच्यापैकी एक सदस्य होते (न्या.रवींद्र व्ही. घुगे.), बीएचएमएस / बीएएमएस /

बीयूएमएस / बीपीटीएच / बीएस्सी आणि नर्सिंगच्या पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्याचा खटला चालवत होते. या प्रकरणात या न्यायालयास नियमांचे उल्लंघन करून अनियमित पद्धतीने विद्यार्थ्यांचे प्रवेश करण्यात आल्याचे निदर्शनास आले, त्याची कारणे व्यवस्थापनास कारणीभूत आहेत. या प्रकरणातील विद्यार्थ्यांची दुर्दशा लक्षात घेऊन न्यायालयाने प्रवेश रद्द करण्याऐवजी न्यायाच्या हितासाठी एक वेळचा उपाय योजना म्हणून महाविद्यालयांच्या व्यवस्थापनांवर दंडात्मक कारवाई करून विद्यार्थ्यांचे प्रवेश नियमित केले.

२६. आमच्यासमोरील याचिकाकर्ते दिनांक १५.०६.२०१५ पासून सेवेत आहेत हे लक्षात घेता, निवड प्रक्रियेच्या पद्धतीत / वर्तणूकीत याचिकाकर्त्याची कोणतीही भूमिका नव्हती आणि तसेच उत्तरवादी क्रमांक ४ ने जारी केलेल्या जाहिरातीत नमूद केलेल्या निकषांनुसार याचिकाकर्ते पात्र आहेत, सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थितीमध्ये, अरीब हसन अन्सारी नजीब हसन अन्सारी विरुद्ध महाराष्ट्र राज्य, (सुप्रा) या खटल्यात ज्या मार्गाचा अवलंब करण्यात आला होता, तोच मार्ग अवलंबण्यास आमचा कल आहे.

२७. निवड प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेसाठी उत्तरवादी क्रमांक ४ पूर्णपणे जबाबदार असून, ज्याला वस्तुस्थिती आणि परिस्थितीत हे खोडसाळपणा म्हणता येईल, आम्हाला

असे आढळले आहे की, गेल्या सुमारे १० वर्षांपासून सेवेत असलेल्या याचिकाकर्त्याच्या रोजगारात अडथळा आणणे न्याय्य ठरणार नाही आणि यामुळे याचिकाकर्त्यास बाध निर्माण होईल. वरील घटक अनियमिततेसाठी उत्तरवादी क्रमांक ४ वर भारी दंड लादण्यासाठी पुरेशी कारणे आहेत. वरील वस्तुस्थिती व परिस्थिती विचारात घेऊन खर्चापोटी उत्तरवादी क्रमांक ४ ला रक्कम रु.२,५०,०००/- ( दोन लाख पन्नास हजार रुपये फक्त) ३० दिवसांच्या आत या न्यायालयात जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

२८. अशी रक्कम जमा केल्यावर या न्यायालयाची रजिस्ट्री खालील संस्था/संघटनांना समान प्रमाणात म्हणजेच रु. ५०,०००/- ( पन्नास हजार रुपये फक्त) हस्तांतरित करेल:-

अ) चिल्ड्रन एड सोसायटी, मुंबई

खाते क्रमांक ०२३७०१००००५६१२

बँकेचे नाव : युको बँक

शाखा – माटुंगा

आयएफएससी : युसीबीए००००२३७

ब) प्राण्यांच्या संरक्षणासाठी

खाते क्रमांक ०४०६०१०००१९१०२

बँकेचे नाव : बँक ऑफ बडोदा

शाखा– चंदावरकर रोड शाखा, माटुंगा

आयएफएससी: बीएआरबी०सीएचएएनडीए ('O' हा अक्षर नसून अंक आहे)

एमआयसीआर क्र.: ४०००१२०४६

क) गिरिजा वेल्फेअर असोसिएशन

खाते क्रमांक : ३०९००६३६१५७४

बँकेचे नाव : आरबीएल बँक

शाखा – खारघर

आयएफएससी: आरएटीएन००००७८

ड) के.ई.एम. हॉस्पिटल

रुग्णालयाचे बँक खाते : केईएम हॉस्पिटल, पुअर बॉक्स चॅरिटी फंड

रुग्णालय बँक खाते क्रमांक : ९९३५०१००००८७७ (एस.बी.)

बँक आणि शाखा : बँक ऑफ बडोदा, परळ शाखा

संबंधित बँकेचा पत्ता, दूरध्वनी क्र., फॅक्स क्र. आणि ई-मेल: बँक ऑफ बडोदा, मदिना मंजिल, ८८, आंबेडकर रोड,मुंबई– ४०० ०१२, महाराष्ट्र, ०२२-२४१३१११२/२४१३५८२०, dbpare@bankofbaroda.com

एमआयसीआर कोड नंबर : ४०००१२२४६

आयएफएससी नंबर : बीएआरबी०डीबीपीएआरइ (पाचवे अक्षर शून्य आहे)

पॅन : AAATK ३०८७ D

खात्याचा प्रकार : बचत खाते

ई) बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा

खाते क्रमांक १०९९६७११९३७

बँकेचे नाव : स्टेट बँक ऑफ इंडिया

शाखा – मुंबई मुख्य शाखा

आयएफएससी: एसबीआयएन०००३००

२९. आम्ही उत्तरवादी क्रमांक ४ ला ताकीद देतो की उत्तरवादी क्रमांक ४ यांनी या रकमेची वसुली याचिकाकर्त्याकडून करू नये.

३०. वरील कारणांसाठी, ही रिट याचिका मंजूर केली जाते. आम्ही दिनांक २४.११.२०२३ रोजीचा आक्षेपित आदेश रद्द बातल ठरवतो व उत्तरवादी क्रमांक २ ला याचिकाकर्त्याची दिनांक १५.०६.२०१५ पासून १४.०६.२०१८ पर्यंत शिक्षण सेवक म्हणून व त्यानंतर सहाय्यक शिक्षक म्हणून कायद्यानुसार, आजपासून ३० दिवसांच्या आत नेमणूक करण्यास मान्यता देण्याचे निर्देश देतो.

३१. याचिकाकर्त्याने म्हटले आहे की याचिकाकर्ते टीईटी उत्तीर्ण आहेत, परंतु त्याची पडताळणी केली गेली नाही. त्यामुळे आम्ही सक्षम प्राधिकरणाला आजपासून ३० दिवसांच्या आत याचिकाकर्त्याच्या टीईटी प्रमाणपत्राची पडताळणी करण्याचे आदेश देतो.

३२. याद्वारे उत्तरवादी क्रमांक २ ला याचिकाकर्त्यांचे नाव शालार्थ पद्धतीत प्रविष्ट करण्याचे आणि कायद्याचे काटेकोर पालन करून याचिकाकर्त्यास शालार्थ ओळख जारी करण्याचे निर्देश दिले जातात.

३३. उत्तरवादी क्रमांक ४ ला ३० दिवसांच्या आत रक्कम रु.२,५०,०००/- जमा करण्याचे निर्देश दिले जातात अन्यथा, तसे न केल्यास उत्तरवादी क्रमांक २ ने उत्तरवादी क्रमांक ४ कडून जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे वरील रक्कम वसूल करण्यासाठी पावले उचलावीत.

(न्या. अश्विन डी. भोबे.) (न्या.रवींद्र व्ही. घुगे.)

## अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

*****